जनसंपर्क कक्ष
9 SEP 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गतिमान तंत्रज्ञानाशी मैत्री

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**






सोशल मीडियाच्या युगातील विद्यार्थ्यांशी मैत्री तंत्रज्ञानासोबत अधिक वेगाने व्हावी यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि रिलायन्स जिओ यांच्यामध्ये झालेल्या करारामुळे तंत्रज्ञानासोबत संशोधन या संकल्पनेला वेग येणार आहे. विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनाही ही वाय-फाय सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ऑनलाइन कार्यप्रणालीलाही चालना मिळणार आहे. विद्यापीठाच्या परिसरात ही सेवा नाममात्र शुल्कात उपलब्ध होणार आहे. यातून अभ्यास व संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती मिळवणे, त्यासाठीच्या माहितीपटांची निर्मिती करणे शक्य होईल. विद्यापीठातील कार्यक्रमांचे प्रक्षेपण करण्याच्या उपक्रमालाही तंत्रज्ञानाची जोड मिळेल.

**जिओशी कराराने विद्यापीठात वायफाय सुविधा**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना वाय-फाय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशासनाने रिलायन्स जिओ या कंपनीशी नुकताच सामंजस्य करार केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या कराप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले व इंटरनेट विभाग समन्वयक डॉ. मिलिंद जोशी उपस्थित होते. रिलायन्स जिओतर्फे बालसुब्रमह्मण्यम अय्यर व किशोर पाटील उपस्थित होते. सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी तर रिलायन्सतर्फे अय्यर यांनी स्वाक्षरी केल्या. या कराराच्या औपचारिकतेनंतर वायफाय सुविधा कार्यान्वित करण्याबाबत विद्यापीठ आणि रिलायन्सचे अधिकारी यांच्यामध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आली. विद्यापीठाच्या वर्धापनदिनी ही सेवा सुरू करण्याच्या दृष्टिने सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

या सामंजस्य करारानुसार रिलायन्स जिओतर्फे विद्यापीठाच्या प्रांगणात वाय-फाय सुविधा माफक दरात उपलब्ध होणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना १५३ रुपयांचे रिचार्ज मारल्यानंतर दररोज एक जीबी डेटा वापरण्यासाठी मिळणार आहे. या सेवेचा वेग जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने संशोधन, नवी माहिती मिळवणे, अभ्यासू व्हिडिओंमधून नोंदी करणे या गोष्टी सोप्या होणार आहेत. यासाठी लागणारी उपकरणे व देखभालीचा खर्च रिलायन्स जिओ करणार आहे.



**सध्या विद्यापीठाशी संलग्नित १६२ महाविद्यालयांत रिलायन्स जिओतर्फे वाय-फाय सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे ही सर्व महाविद्यालये विद्यापीठास जोडली जातील. विविध विद्यापीठांच्या संलग्नतेमुळे संशोधन व प्रक्षेपणाच्या पातळीवरही संवाद साधण्याची संधी या करारामुळे निर्माण होणार आहे. विद्यापीठासह महाविद्यालयांत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे प्रक्षेपण जिओ सेवेद्वारे करता येणे शक्य होणार आहे. तसेच, जिओ चॅट सेवेद्वारे संपर्क साधणे सुलभ होणार आहे.**

**- डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

9 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



माळरानावर गर्द हिरवाई फुलली आहे. रानफुलांनाही चांगलाच बहर आला आहे. रानभर पसरलेली चुटूकदार रंगीबेरंगी फुले चटकन लक्ष वेधून घेत आहेत. गर्द हिरवाईत हळुवार डोलणाऱ्या फुलांच्या ताटव्यांनी मन प्रसन्न होऊन जात आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातील हा बहर टिपलाय अमित गद्रे यांनी.

9 SEP 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योगांना विशेष कौशल्यपूर्ण व्यवस्थापनाची गरज : माने

## विद्यापीठात इंडस्ट्रीयल इन्स्टीट्यूशन इंटरअॅक्शन कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सध्याच्या जागतिकीकरणाच्या वातावरणात उद्योगांना विशेष कौशल्यपूर्ण व्यवस्थापनाची गरज आहे. उद्योगांची गरज पूर्ण करण्यासाठी इंडस्ट्रीयल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन गरजेचे आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे आनंद माने यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मानव्यशास्त्र इमारतीमध्ये एम.बी.ए.अधिविभागामार्फत आयोजित 'इंडस्ट्रीयल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन' कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के होते.

माने म्हणाले, बदलत्या परिस्थितीत उद्योगांसमोर समस्या, आव्हाने वाढत चालली आहेत. याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्रभारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सातत्याने होणारे औद्योगिक क्षेत्रातील बदल विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्यास या क्षेत्रात काम करण्याच्या प्रचंड संधी उपलब्ध होऊ शकतात. प्रथम सत्रात साऊंड कास्टिंगचे अध्यक्ष व्ही. एन. देशपांडे व द्वितीय सत्रामध्ये मार्केटिंग डायरेक्टर संजीव तुंगतकर यांनी मार्गदर्शन केले.



कोल्हापूर : 'इंडस्ट्रीयल इन्स्टिटयूशन इंटरॅक्शन' कार्यक्रमाचे झाडाला पाणी घालून उद्घाटन करताना प्रभारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, चेंबर ऑफ कॉमर्सचे आनंद माने, डॉ. एच. एम. ठकार आदी.

यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी क्वॉलिटी मॅनेजमेंटबाबत माहिती दिली.

एम.बी.ए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी कार्यक्रमाची रुपरेषा मांडली. डॉ. डी. आर. इंगवले, गं. व्ही. खारगे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. यावेळी डॉ. एस. एस. महाजन, डॉ. के. व्ही. मारुलकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 SEP 2017
पुण्यनगरी

# चांगल्या प्रश्नांमुळे ज्ञाननिर्मितीत भर : शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

चांगल्या प्रश्नांमुळे संवाद कौशल्ये आत्मसात होतात. प्रश्नांमुळेच ज्ञानार्जनामध्ये भर पडते. त्यामुळे नव्या पिढीने प्रश्न विचारावेत, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ आणि शाहू कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने श्रमसंस्कार शिबिराचा समारोप करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विटा (जि. सांगली) येथील बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. ए. टी. साळुंखे होते. शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांना विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्या. स्वागत व प्रस्ताविक प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी केले. शिबिरामध्ये १६० स्वयंसेवकांनी श्रमदान केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 SEP 2017
तरुण भारत

# रंकाळा तलावाला पुन्हा जलपर्णीचा धोका




प्रतिनिधी
कोल्हापूर

ऐतिहासिक रंकाळा तलावातील पाणी जलपर्णी वाढीसाठी पोषक असल्याचा अहवाल शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाने दिला आहे. रंकाळ्यामध्ये मैला मिश्रीत पाणी मिसळत असल्यामुळेच जलपर्णी वाढत असल्याचा स्पष्ट उल्लेख या अहवालात केला आहे. त्यामुळे महापालिकेने यापूर्वी केलेल्या सर्व उपाय योजना 'पाण्यात' गेल्या असल्याचे समोर आले आहे.

रंकाळ्याच्या संध्यामठ परिसरातील पाण्यात गेल्या काही दिवसांपासून हिरवा तवंग आला आहे. तसेच परिसरात दुर्गंधी पसरली आहे. यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य पुन्हा धोक्यात आले आहे. रंकाळ्यामध्ये मिसळणारे सांडपाणी दुधाळी नाल्याकडे वर्ग केले असल्याचा दावा महापालिकेने केला होता. तरीही रंकाळ्यामध्ये हिरवा तवंग कोणत्या कारणामुळे आला आहे, याची माहिती होण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाने पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. रंकाळा परिसरात शाम सोसायटी नाला, देशमुख हॉल नाला, सरनाईक नाला व परताळा नाला असे चार नाले आहेत. मुसळधार पावसामध्ये नाल्यातून सांडपाणी थेट रंकाळ्यात मिसळत आहे. त्यामुळेच रंकाळ्याचे पाणी प्रदुषीत होत असल्याचे शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाने म्हटले आहे.

या आहवालामध्ये पाण्यातील नायट्रेट १६ वरुन २६ वर गेल्याचे सांगण्यात आले आहे. परिणामी रंकाळामध्ये जलपर्णीत वाढ होणार आहे. यावर वेळीच मनपा प्रशासनाने उपाय केल्या नाही तर पुन्हा संपूर्ण रंकाळयात जलपर्णी पसरण्यास वेळ लागणार नाही.

- **शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागाच्या अहवालात स्पष्ट संकेत**
- **सांडपाणी थेट रंकाळ्यात मिसळल्याचे परिणाम**
- **मनपाने वेळीच उपाय करणे गरजेचे**

9 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मैलायुक्त सांडपाण्यामुळेच रंकाळा प्रदूषित

## विद्यापीठाचा महापालिकेस अहवाल

कोल्हापूर, ता. ८ : पावसाळ्यात रंकाळा तलावात मिसळणाऱ्या मैलायुक्त सांडपाण्यामुळेच रंकाळा तलाव प्रदूषित झाल्याचे अहवालात स्पष्ट झाले. शिवाजी विद्यापीठाकडून महापालिकेला यासंबंधी नुकताच अहवाल मिळाला. सांडपाण्याचे नाले २०१९ पर्यंत न अडविल्यास प्रदूषण स्थिती गंभीर होईल, असेही या अहवालात म्हटले आहे.

'सकाळ'ने रंकाळा तलाव हिरवागार झाल्याची बातमी छायाचित्रासह प्रसिद्ध केली. त्याची दखल घेत महापालिकेच्या ड्रेनेज व पाणीपुरवठा विभागाने पाण्याचे नमुने घेतले. तपासणीसाठी ते विद्यापीठाकडे पाठविले. त्याचा अहवाल नुकताच

पान ९ वर »



### अहवाल काय सांगतो?

- पाण्यातील नायट्रेट १६ ते २६ वरून २३.१ ते २६.२ गेले
- यंदाच्या पावसाळ्यात सांडपाणी थेट मिसळले
- ब्ल्यू ग्रीन अलगीचे प्रमाण वाढले
- सांडपाणी मिसळणे न थांबविल्यास केंदाळाचा धोका

मैलायुक्त सांडपाण्यामुळेच रंकाळा प्रदूषित

» पान १ वरून

प्राप्त झाला. पाण्यातील नायट्रेट १६ ते २६ वरून २३.१ ते २६.२ गेल्याचे नमूद आहे. गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत प्रमाण स्थिर असले तरी यंदाच्या पावसाळ्यात मैलामिश्रित सांडपाणी थेट तलावात मिसळले. त्याचा परिणाम म्हणून 'ब्ल्यू ग्रीन अलगी' या वनस्पतीने पुन्हा पाय पसरले. ही वनस्पती पाणी हिरवेगार बनण्यास कारणीभूत आहे.

कोट्यवधी रुपये खर्चून श्याम सोसायटीचा नाला वळविण्यात आला. उपनगरातून मोठ्या प्रमाणात सांडपाणी याच नाल्यातून मिसळते. उन्हाळ्यात सांडपाणी वळविण्याची व्यवस्था आहे. मात्र, पावसाळ्यात या पाण्याबरोबर मैलामिश्रित सांडपाणी तलावात मिसळते. सरनाईक कॉलनी, देशमुख हॉलसमोरील नाला, श्याम सोसायटी आणि पदपथ उद्यानाच्या पिछाडीस असलेल्या नाल्यातून सांडपाणी मिसळते. सप्टेंबरमधील उन्हाचा कडाका आणि सांडपाण्यामुळे 'ब्ल्यू ग्रीन अलगी'स वाव मिळाला.

२०१९ पर्यंत नाले न अडविल्यास पूर्वीप्रमाणे जलपर्णींचा (केंदाळ) धोका होऊ शकतो, असेही या अहवालात नमूद केले आहे. साडेसात कोटी रुपये खर्चून ड्रेनेजलाईन टाकण्यात आली. त्या वेळी पावसाळ्यात मिसळणाऱ्या सांडपाण्याचा विचार का करण्यात आला नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

9 SEP 2017
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढील आठवड्यात प्रक्रियेला प्रारंभ : शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालयीन पातळीवर हालचालींना वेग

# विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसाठी दिवाळीनंतर मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील अधिसभा, विद्या परिषद, आदी अधिकार मंडळांसाठी दिवाळीनंतर मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे, त्यांची छाननी, माघारीबाबतच्या प्रक्रियेला पुढील आठवड्यात प्रारंभ होईल. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ, महाविद्यालयीन पातळ्यांवर हालचालींना वेग आला आहे.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाची अधिकार मंडळे अस्तित्वात येणार आहेत. अधिसभा, विद्या परिषद, विविध विद्याशाखांच्या एकूण ४७ अभ्यास मंडळांवरील १८८ जागांसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. यातील नोंदणीकृत पदवीधर गटासाठीची नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यात १४ हजार ४०० पदवीधर मतदानासाठी पात्र ठरले आहेत. अपात्र आणि दुरुस्तीसाठी सुमारे चार हजार जणांचे अर्ज आहेत. संस्था, प्राचार्य, शिक्षक गटांसाठीची महाविद्यालयनिहाय मतदारांची माहिती संकलनाचे काम विद्यापीठ पातळीवर सुरु आहे.

ऑक्टोबरमध्ये दिवाळी झाल्यानंतर अधिकार मंडळांसाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठीच्या प्रक्रियेला पुढील आठवड्यामध्ये प्रारंभ होईल. यात सुरुवातीला कच्ची यादी जाहीर केली जाईल. यावर हरकती नोंदविण्यासाठी पाच दिवसांची मुदत असणार आहे. यानंतर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. यादी प्रसिद्ध झाल्यावर उमेदवारी अर्ज भरणे, त्यांची छाननी, माघार, आदी स्वरूपातील प्रक्रिया होणार आहे. येत्या तीन ते चार दिवसांत कच्ची मतदार यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या निवडणुकीच्या मैदानात उतरणाऱ्या शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, अभाविप, आदी संघटनांकडून कार्यवाहीला वेग आला आहे. मतदार नोंदणीसाठी दाखल केलेल्या अर्जांतील त्रुटींची पूर्तता, गटनिहाय उमेदवारांची निवडीसाठी चाचपणी, आदी कार्यवाही संघटनांकडून सुरु आहे.

## या जागांसाठी होणार मतदान

अधिसभा (कंसात जागा) : शिक्षक, प्राचार्य आणि नोंदणीकृत पदवीधर गट (प्रत्येकी १०), संस्था प्रतिनिधी (६), विद्यापीठ कॅम्पसवरील शिक्षक गट (३). विद्या परिषद : शिक्षक गट (८). एकूण ४७ अभ्यास मंडळे (प्रत्येकी ३) : १४१.



## अभ्यास मंडळे अशी

| | |
|---|---|
| 19 | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| 04 | वाणिज्य व व्यवस्थापन |
| 14 | मानव्यशास्त्र |
| 28 | आंतर विद्याशाखीय |

9 SEP 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंचितांची प्रगती शासनाची जबाबदारी

## प्रा. डॉ. एस. गुरसामी यांचे मत

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारतीय समाजाची मानसिकता हा वंचित समूहांच्या सशक्तीकरणातील सर्वात मोठा अडथळा आहे. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी सर्वसमावेशक धोरणाची तरतूद भारतीय राज्यघटनेमध्ये केलेली असली तरी अपेक्षित ध्येय अद्याप गाठलेले नाही. वंचितांची प्रगती करणे ही सर्व शिक्षितांची व शासनाची जबाबदारी आहे, असे मत तामिळनाडू येथील गांधी ग्राम ग्रामीण विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. गुरसामी यांनी व्यक्त केले.




**कोल्हापूर : समाजशास्त्र अधिविभागामध्ये यू.जी.सी. सॅप-फेज थ्री अंतर्गत आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी बोलताना तामिळनाडू येथील गांधी ग्राम ग्रामीण विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. गुरसामी. डॉ. प्रतिमा पवार, प्रा. डॉ. आर. बी. पाटील, डॉ. जगन कराडे, डॉ. प्रतिभा देसाई.**

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभागामध्ये यू.जी.सी. सॅप-फेज थ्री अंतर्गत आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

समाजशास्त्र अधिविभाग विभागप्रमुख व सॅपचे समन्वयक प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. गुरसामी म्हणाले, भारतीय समाज व्यवस्थेला जाती व्यवस्थेबरोबर वर्ग व्यवस्थेने सुद्धा ग्रासलेले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ७० वर्षांनंतरही कोईमतूर, मीनाक्षीपूरम येथील जातीय-भेदभावाच्या घटना याची उदाहरणे आहेत. त्यामुळे उच्चवर्गीय व कनिष्ठ वर्गीय यांच्यातील दरी दिवसेंदिवस रूंदावत चालली आहे. वंचित समूहांचा सर्वंकष अभ्यास करणे हे समाजशास्त्राच्या अभ्यासकाचे ध्येय असले पाहिजे, असेही ते म्हणाले.

डॉ. जगन कराडे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, भारतातील एकूणच वंचित समूहांची स्थिती सर्व राज्यांमध्ये जवळपास सारखीच असल्याचे दिसून येते. म्हणून वंचित समूहांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासकीय धोरणांची अंमलबजावणी काटेकोरपणे होणे अत्यंत गरजेचे आहे. 'सॅप' च्या उपसमन्वयक डॉ. प्रतिमा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. आर. बी. पाटील, संशोधक विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 SEP 2011
तरुण भारत

# ग्रंथालय म्हणजे ज्ञान माहितीचे दालन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षण आणि ग्रंथालयाचे स्वरुप सध्या बदलत आहे. ग्रंथालयात केवळ पुस्तके भरलेली नसतात तर ज्ञानस्रोत आणि माहिती पुरविणारी संसाधाने असतात. पुस्तके माणसांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडवितात. त्यामुळे ग्रंथालये हि ज्ञानसंप्रेषणाची समृद्ध दालने आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेतंर्गत आयोजित कार्यशाळेत 'माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर' या विषयावर त्या बोलत होत्या. कार्यशाळेची सुरवात स्वामी विवेकानंद, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, श्रीमती सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर प्रमुख उपस्थित होते.

**ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांचे प्रतिपादन**

खोत म्हणाल्या, ग्रंथालयांनी चांगली दर्जेदार पुस्तके व संशोधन माहिती विद्यार्थी व वाचकांपर्यंत पोहचवावी. आज इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती घरबसल्या मिळवता येते. पण ग्रंथालयात जाऊन ज्ञान संपादन करणे आवश्यक आहे. पुस्तके माणसाचे जीवन घडवितात. त्यामुळे बदलत्या जगातील ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत केले पाहिजे. तसेच याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. होनगेकर, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल डॉ. एस. एन. इनामदार, बिद्री येथील दूधसागर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. ए. आर. नगरकर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले. सूत्रसंचलन सुषमा इंगळे, सिमरन घुडुभाई यांनी केले. सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. कार्यशाळेस शिवाजी विद्यापीठ, शहाजी कॉलेज क्लस्टर अंतर्गत येणाऱ्या १६ महाविद्यालयातील ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 SEP 2017

पुढारी

# ‘विवेकानंद’ मध्ये जीएसटीवर कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय क्लस्टर योजनेंतर्गत ‘भारतातील कररचना व जीएसटी’ या विषयावर कार्यशाळा झाली. उद्घाटन डॉ. पी. एस. कांबळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. प्रास्ताविक समन्वयक प्रा. वाय. डी. हरताळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा.डॉ.एस.जी.गावडे यांनी करून दिली. प्रा.संदीप पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ.एम.व्ही.चरणकर, प्रा.एस.एम.जोशी, डॉ.एस. एस. घोरपडे, प्रा. समिक्षा फराकटे, प्रा.एस.एम.रुईकर, प्रा.बी.के.गोसावी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 9 SEP 2017

सकाळ

# 'विवेकानंद'मध्ये उद्या चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ७ : विवेकानंद महाविद्यालयात हिंदी विभाग, शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेतर्फे शनिवारी (ता. ९) परिषदेचे तिसरे वार्षिक अधिवेशन, राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. '२१वीं सदी के हिंदी साहित्य में नव विमर्श : विविध आयाम' या विषयावरील एक दिवसीय चर्चासत्र साकाळी नऊला सुरू होईल.

केरळ व लक्षद्वीपचे माजी प्राप्तीकर लोकपाल कमलाकांत त्रिपाठी यांचे प्रमुख भाषण होईल. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी असतील. पहिल्या सत्रासाठी बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे डॉ. गिरीश काशीद हे तज्ज्ञ, डॉ. माधवी जाधव अध्यक्ष असतील. दुसऱ्या सत्रासाठी विद्यापीठाचे माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण हे तज्ज्ञ, विटा येथील आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश मोकाशी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील.